# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्याबाबत

**(१) ३१४२ (०२-०६-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासन निर्णय, दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ अन्वये ५९७२ व इतर नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना तसेच अनुदानित माध्यमिक शाळांना वाढीव विद्यार्थी संख्येच्या आधारावर नैसर्गिक वाढीच्या वर्ग तुकड्या मंजूर करण्यात आल्या असून मागील सन २०१७ मध्ये ५ वर्ष पूर्ण झाल्याने शासन निर्णयात ५ वर्षानंतर अनुदान दिले जाईल असा उल्लेख केला असूनसुध्दा त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व अन्य संघटनांनी आंदोलने केली असून लोकप्रतिनिधींनी सुध्दा अनेकवेळा निवेदने दिली, परंतु शासनाने आश्वासन देवूनही दिलेल्या आश्वासनाची पुर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्यासाठी या तुकड्यांची तपासणी करून सदर माहिती शासनाकडे प्राप्त झाली आहे काय, या नैसर्गिक तुकड्यांना शासनाकडून सेवक संच, सध्याची अद्ययावत बिंदूनामावली इ.त्रुटी काढून अपात्र केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या मागासवर्ग कक्ष आयोगाकडून बिंदूनामावली तपासणी बंद असल्याने व जुन्या बिंदूनामावलीप्रमाणे पदभरती केल्याने त्यांना जुन्या बिंदूनामावलीप्रमाणे पात्र करून अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनेक अनुदानित माध्यमिक शाळांचे नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांचे अनुदानास पात्र घोषित करण्यासाठीचे अनेक प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्याने तुकड्यांना अनुदान मंजूर करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे, तसेच निर्णय घेवून तुकड्यांना केव्हापर्यंत अनुदान मंजूर करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-०६-२०२२)** : (१) सदर शासन निर्णयात एकूण ५९७३ अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर काही अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीमध्ये अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा व तुकड्यांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुढील आदेशापर्यंत “सरसकट २०%” प्रमाणे अनुदान देण्यास काही अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन निर्णय दिनांक १९/९/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर धोरणात कोणताही बदल झालेला नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

मागासवर्ग कक्षाकडून बिंदूनामावली बंद असली तरी, जुनी बिंदूनामावली किंवा शिक्षणाधिकारी यांचा आरक्षणासंदर्भातील गोषवारा ग्राहय धरुन शाळांना पात्र ठरविण्यात येत आहे.

(५) मुल्यांकन झालेल्या अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या प्रस्तावांची आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावर तपासणी करुन शासनास प्राप्त झाले असून त्यावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे नवीन पोलीस ठाणे व पोलीस निवासस्थानाची इमारत बांधण्याबाबत

**(२) ९२६८ (१४-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना स्वत:ची घरे नसल्यामुळे भाडे तत्वावर रुम घेऊन रहावे लागत असून वासिंद पोलिसांना तेथील बैठ्या व पडक्या चाळीतील दाटीवाटीत असलेल्या खोल्यांमधून पोलीस ठाण्याचे काम पहावे लागत असल्याने जागेअभावी पोलिसांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वासिंद येथे नवीन पोलीस ठाणे व पोलीस निवासस्थान उभारण्याबाबत तेथील ३९ गुंठे जमीन राखीव असल्यामुळे त्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविला असून सदरहू प्रस्ताव अनेक वर्षापासून वरिष्ठ पातळीवर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वासिंद येथे नवीन पोलीस ठाणे व पोलीस निवासस्थानाची नवीन इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०७-०६-२०२२) :** (१), (२) व (३) I. वासिंद पोलीस ठाणे साठी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम हे जे.एस.डब्ल्यू.स्टील कोटेड प्रोडक्ट कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (CSR Fund) करण्याची कार्यवाही सुरु आहे.

II. वाशिंद पोलीस ठाणे बाबत जे.एस.डब्ल्यू.स्टील कोटेड प्रोडक्ट कंपनीचे प्रशासकीय व तांत्रिक बाबींच्या पुर्तता करण्याचे काम सुरु आहे. तसेच वाशिंद पोलीस ठाणे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत वास्तुविशारदाची नियुक्ती, भूखंड सर्वेक्षण आणि मूलभूत गरजाचे सर्वेक्षण, बेसिक डिझाईन,

दोन पर्यायी डिझाईनसह आर्किटेक्चरल डिझाईन इत्यादी उपक्रम पूर्ण करण्यात आलेले असून तपशिलवार अभियांत्रिकीचे काम प्रगतीत आहे. त्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.
III. वासिंद येथे नवीन पोलीस सेवानिवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अत्यावश्यक सेवेंतर्गत रुग्णवाहिकांचा वापर फिरता दवाखाना म्हणून करण्याबाबत

**(३) ११७२२ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १०८ अत्यावश्यक सेवेंतर्गत ९३७ रुग्णवाहिका कार्यरत असून या रुग्णवाहिकांचा वापर रुग्णांची ने-आण करण्यासाठी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन रूपी क्लिनिकच्या संचालकांनी या रुग्णवाहिकांचा वापर फिरता दवाखाना म्हणून करण्यासाठीची परवानगी दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांकडे मागितली असतानाही आजतागायत सदरहू प्रस्तावावर शासनाने सकारात्मक निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील गोर-गरीब जनतेस आरोग्य सुविधा प्राप्त होण्यासाठी सदरहू प्रस्तावावर कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१३-०५-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर निवेदन ह्या विभागात आढळून आले नाही.

(३) व (४) महाराष्ट्र अपात्कालीन वैद्यकीय सेवा या योजनेंतर्गत रुग्णांना आपत्कालीन परिस्थितीत पहिल्या सुवर्ण तासामध्ये वैद्यकीय उपचार उपलब्ध करुन देण्यात येतात. तातडीच्या वेळी सदर रुग्णवाहिका आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना मिळणे आवश्यक असल्याने १०८ रुग्णवाहिका फिरता दवाखाना म्हणून वापरता येणार नसल्याने तसा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्याचे तत्कालीन अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांच्यावर कारवाई होणेबाबत

**(४) ११८१० (३०-०३-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील औरंगाबाद रोडवरील हॉटेल आदर्श पॅलेस मध्ये दिनांक ३ मे, २०१५ रोजी रात्री जालन्याचे तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक यांनी पाण्याच्या बाटलीचे पैसे देण्यावरुन हॉटेल मालक व कर्मचारी यांच्याशी वाद घातल्यानंतर हॉटेल व्यवस्थापक यांनी अप्पर पोलीस अधीक्षक यांचेविरुध्द तक्रार दाखल करुन मा.न्यायालयात तक्रार अर्ज दाखल केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना प्रथमवर्ग मा.न्यायालयाने उक्त घटनेबाबत चौकशी करुन तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक व इतरांवर गुन्हे दाखल करुन अटक करण्याचे आदेश चंदनजिरा पोलीस प्रशासनाला देवूनही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यास चंदनजिरा पोलीस दुर्लक्ष करीत असल्यामुळे तक्रारदार संजय राऊत यांनी पोलीस ठाण्यासमोर स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंदनझीरा पोलीस प्रशासनाकडून जालन्याचे तत्कालीन अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे मा.न्यायालयाचा अवमान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दोषी आरोपीवर गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच मा.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या चंदनजिरा पोलीस प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०६-२०२२)** : (१), (२), (३) व (४) तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक, जालना व त्यांचे सहकारी यांच्याव्दारे हॉटेल आदर्श पॅलेसचे मालक, व्यवस्थापक व इतर यांचे विरुध्द पोलीस ठाणे चंदनझीरा येथे दिनांक ०४/०५/२०१५ रोजी गुरनं ६४/२०१५ कलम ३५३,३३२, ५०४, ३४ भादंवि सह कलम ३ व ४ अनैतिक देह व्यापार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आल्याने त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई केली होती. तदनंतर तक्रारदार यांनी दिनांक २०/०५/२०१८ रोजी मा.न्यायालयात सिआरपीसी कलम १५६ (३) प्रमाणे गुन्हा दाखल होण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. सदर प्रकरणी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट (दुसरे) जालना यांनी दिनांक १०/१२/२०१९ रोजी तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक, जालना व त्यांचे सहकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश पारीत केले होते. सदर आदेशाविरुध्द गैर अर्जदार यांनी मा.सत्र न्यायालय येथे दाखल केलेल्या रिव्हीजन पिटीशन मध्ये मा.जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांनी त्यांच्या दिनांक ०४/०१/२०२० रोजीच्या आदेशान्वये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट-दुसरे) जालना यांचे क्रि.एम.ए. ३२७/२०१८ मध्ये गुन्हा दाखल करण्याचे दिनांक १०/१२/२०१९ रोजीचे आदेश रद्द केलेले आहेत. मा.वरिष्ठ न्यायालय यांनी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट दुसरे) यांनी गुन्हा दाखल करण्याबाबत दिलेले आदेश रद्द केले असल्याने तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक, जालना व त्यांचे सहकारी यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला नाही. त्यामुळे, मा.न्यायालयाचे आदेशाचे अवमान झालेला नाही. तसेच तक्रारदार यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी व त्यासुमारास स्वत:ला पेटवून घेण्याबाबतचा प्रयत्न केला असा कोणताही प्रकार घडलेला नाही. सदर प्रकरणात तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक यांनी

चौकशी करुन सादर केलेले अहवालात अर्जदार यांनी केलेले आरोप खोटे असल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलीस नाईक पद प्रत्यार्पित करुन अन्य अंमलदारांच्या पदसंख्येत वाढ करण्याबाबत

**(५) ११८५२ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ११६३६ ला दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस दलातील अंमलदाराच्या पदोन्नतीसाठी लागणारा कालावधी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून पदोन्नती साखळीतील पोलीस नाईक हे पद प्रत्यार्पित करुन अन्य अंमलदारांच्या पदसंख्येत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी शासनास सादर केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप आणि सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस नाईक पद प्रत्यार्पित करुन अन्य अंमलदारांच्या पदसंख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०६-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.

पोलीस नाईक हे पद टप्प्याटप्प्याने निरसित करुन अन्य अंमलदारांच्या पदसंख्येत वाढीचा प्रस्ताव सादर केला आहे.
(२), (३) व (४) राज्यातील पोलीस दलांतर्गत अंमलदार संवर्गातील पदोन्नतीमधील कुंठीतता दूर करण्याचे दृष्टीने व पोलीस शिपाई या संवर्गातील अंमलदारास किमान पोलीस उपनिरीक्षक या पदावरुन सेवानिवृत्त होता यावे या दृष्टीकोनातून पदोन्नती साखळीतील पोलीस नाईक हे पद

टप्प्याटप्प्याने निरसित करुन ही पदे सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व पोलीस शिपाई या संवर्गात वर्ग करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक २५/०२/२०२२ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

सदरहू निर्णयानुसार पोलीस नाईक हे पद निरसित करतानाच ज्या पोलीस अंमलदारांनी पोलीस दलात ३० वर्षे सेवा केली आहे व सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर किमान ३ वर्षे सेवा बजावली आहे तसेच आश्वासित प्रगती योजनेच्या लाभानुसार पोलीस उप निरीक्षक संवर्गाच्या पदाची वेतनश्रेणी घेत असलेल्या सहायक पोलीस उप निरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म्हणून संबोधण्यात येणार असून त्यांच्या गणवेशात अतिरिक्त एक स्टार समाविष्ठ राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय भूखंडांवरील संस्थांना अकृषिक कर भरण्याच्या केलेल्या सूचनाबाबत

**(६) ११८८३ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय भूखंडावरील गृहनिर्माण संस्थांना सन २०११ ते २०१६ या कालावधीसाठी सन २०११ च्या बाजारभावाने आणि सन २०१६ ते २०२१ या काळासाठी सन २०१६ च्या बाजारभावाने सात दिवसांत अकृषिक कर (एनए) भरण्याच्या नोटीसा तहसिलदार कार्यालयांनी जारी केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५ वर्षानंतर अशा नोटीसा पुन्हा जारी करण्यात आल्या असून अनेक गृहनिर्माण संस्थांना अकृषिक करा पोटी लाखो रुपये भरावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गृहनिर्माण संस्थांना अकृषिक कर भरण्यासाठी हप्ते आखून देण्याबाबत काही दिवसांचा कालावधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२२) :** (१), (२),(३) व (४) शासनाने दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकान्वये, अकृषिक आकारणीच्या वसूलीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत व सुधारित अकृषिक प्रमाणदारच्या आधारे अकृषिक आकारणी करून ती वसूल करण्यासंदर्भात सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिशानिर्देश दिले होते. त्यानुसार सन २०११ ते २०१६ या कालावधीसाठी सन २०११ च्या बाजारभावाने आणि सन २०१६ ते २०२१ या कालावधीसाठी सन २०१६ च्या बाजारभावाने अकृषिक कर (एन. ए) वसूल करण्याबाबतची कार्यवाही सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत होती.

तथापि, शासनाने दिनांक ०७/०४/२०२२ च्या पत्रान्वये, सर्व जिल्हाधिकारी कार्यालयास कळविलेले आहे की, दिनांक ०५/०२/२०१८ च्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे क्षेत्रिय स्तरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीच्या वसूलीस पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरती स्थगिती दिलेली आहे व यानुषंगाने सक्तीच्या वसूलीसंदर्भात केलेली कार्यवाही थांबविण्यात यावी.

---

## मुंबईकरांना प्रवासासाठी ‘रेंट अ बाईक’ सुविधा देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(७) ११८९१ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका व्हावी, यासाठी मुंबईकरांना प्रवासासाठी ‘रेंट अ बाईक’ सुविधा देण्याचा प्रस्ताव नामांकित खाजगी कंपन्यांनी परिवहन विभागाकडे दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०८-०६-२०२२) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जोडपरळी, पोटा, पिंपळगाव कुटे आणि ममदापूर (जि.परभणी) येथे पुर्णा नदीवर उच्च पातळी बंधारे बांधण्याबाबत

**(८) १२१०० (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोडपरळी, पोटा, पिंपळगाव कुटे आणि ममदापूर (जि.परभणी) येथे पुर्णा नदीवर चार उच्च पातळी बंधारे उभारण्याबाबत मा.जलसंपदा मंत्री यांनी सन २०२१ मध्ये घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्यांसाठी लागणारी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता आणि निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच नदीवर बांधण्यात येणाऱ्या चार बंधाऱ्यांबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१४-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुर्णा नदीवर हिंगोली जिल्ह्यात जोडपरळी, पोटा व पिंपळगाव कुटे हे तीन उच्च पातळी बंधारे तसेच परभणी जिल्ह्यात पूर्णा नदीवर ममदापूर उच्च पातळी बंधारा असे एकूण चार उच्च पातळी बंधाऱ्यांची अंदाजपत्रके महामंडळ स्तरावरुन प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीकरीता राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांच्याकडे सादर करण्यात आली आहेत. सदर अंदाजपत्रकांची छाननी समितीस्तरावर प्रगतीत आहे.

पुर्णा नदीवरील उपरोक्त चारही उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

हिंगोली जिल्ह्यातील प्रस्तावित पोटा उच्च पातळी बंधारा ता.औंढा, जोडपरळी उच्च पातळी बंधारा ता.वसमत व पिंपळ गाव कुटे उच्च पातळी बंधारा ता.वसमत या बंधाऱ्यांची साठवण क्षमता अनुक्रमे ९.५७ दलघमी ९.७५ दलघमी व ८.९४ दलघमी असून सिंचन क्षमता अनुक्रमे १७३६ हे., १७३२ हे. व १६३४ हे. आहे. तसेच प्रस्तावित ममदापुर उच्च पातळी बंधारा, ता.पूर्णा, जि.परभणी या बंधाऱ्याची साठवण क्षमता ९.१० दलघमी व सिंचन क्षामता १६६१ हे. आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या शिक्षण विभागाच्या लेखाशीर्ष - १९०१, १९४८ व एच-९७३ हे लेखाशीर्ष कार्यक्रमातून अनिवार्य करण्याबाबत

**(९) १२४२८ (०६-०४-२०२२) श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शिक्षण विभागाचे लेखाशीर्ष- १९०१, १९४८ व एच-९७३ हे लेखाशीर्ष कार्यक्रमातून अनिवार्य (Plan to Non-Plan) न केल्यामुळे वेतन अनुदानाअभावी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखाशीर्ष १९०१, १९४८ व एच-९७३ हे लेखाशीर्ष कार्यक्रमातून अनिवार्य करण्याबाबत शासन स्तरावर अनेक वेळा पत्रव्यवहार करून देखील कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षण विभागाचे लेखाशीर्ष १९०१, १९४८ व एच-९७३ अनिवार्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वित्त विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ नूसार आदिवासी उप योजना राबविणाऱ्या ज्या आस्थापना आहेत, त्याचेसाठी उपलब्ध होणारा निधी हा कार्यक्रमांवरील खर्चाकडे वर्ग करण्यात येईल, असे निदेश देण्यात आले असल्यामुळे सदर लेखाशीर्ष अनिवार्य खर्चात समाविष्ट करता येत नाही. तथापि, विभागाकडून सदरचा प्रस्ताव आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग यांचेमार्फत वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला असता, वित्त विभागाकडून सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरी व ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याबाबत

**(१०) १२४८३ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरासह जिल्हयातील वर्ग १ ते ८ मधील सर्व विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व मध्यान्ह भोजन देण्याची शासनाची योजना असून सन २०१९-२०२० मधील कोरोना संसर्गामुळे माहे जुलै, २०२१ पासून सदरहू योजना बंद असून नागपूर शहरी व ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील सर्व शाळा नियमित सुरू झाल्या असून दिनांक १५ मार्चपासून सर्व शाळांमध्ये पोषण आहार देण्याचे आदेश शिक्षण संचालनालयाने संबंधित पुरवठादारांना दिले असूनही ग्रामीण भागातील शाळांमध्ये माहे मार्च, २०२२ अखेरीपर्यंत धान्य व कडधान्य वेळेवर न पोहचल्याने अनेक शाळांमधील विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजना पुन्हा सुरु करुन विद्यार्थांना शालेय पोषण आहार देण्याबाबत तसेच योजनेसाठी लागणारे धान्य व इतर कच्चा माल गोदामात पडून राहत असल्याने आहार व धान्य विद्यार्थ्यांना घरपोच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-०६-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाने सन २०२१-२२ वर्षाच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती दिली होती. परिणामी जिल्हानिहाय पुरवठादार नियुक्तीस विलंब झाला आहे. तथापि, नवीन पुरवठेदार नियुक्त झाल्यानंतर ऑगस्ट, २०२२ पासून योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

पुरवठादाराकडून विहित कालावधीत शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा न झाल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम झाला आहे. तथापि, पुरवठादाराकडून शाळांना धान्यादी मालाचा पुरवठा झाल्यावर नियमितरित्या विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा करण्यात आला आहे.

(३) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शाळा बंद कालावधीत विद्यार्थ्यांना अनुज्ञेय कोरडा शिधा वाटप व शाळा सुरू झाल्यानंतर शिजवलेल्या आहाराचा पुरवठा करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर शिजवलेला आहार न मिळाल्यामुळे शिल्लक राहिलेला तांदुळ व धान्यादी मालाचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात तंटामुक्ती पुरस्कार देण्याबाबत

**(११) १२७६७ (३०-०३-२०२२) श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील सात वर्षापासून तंटामुक्ती पुरस्कार देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाव शांततेतून समृद्धीकडे जावे यासाठी शासनाच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेमुळे राज्यात हजारो गाव तंटामुक्त झाली असतानाही सन २०१५-१६ पासून २०२१-२२ या सात वर्षातील पुरस्कराची घोषणा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तंटामुक्ती पुरस्कार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२२-०६-२०२२) :** (१) व (२) होय.
(३) व (४) प्रस्तुत योजनेत काही सुधारणा प्रस्तावित करून सदर योजनेंतर्गत गठित राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेने या सुधारणा करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे विचाराधीन आहे.

---

## औरंगाबाद जिल्ह्यात भूमि अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून जमिनीची मोजणी व प्लॉटच्या मोजणी विनाविलंब करण्याबाबत

**(१२) १२८९९ (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात फक्त जमिनीची मोजणीकरीता माहे जुलै,२०२१ पर्यंत अर्ज करणारे आता प्लॉटच्या मोजणीसाठीदेखील भूमि अभिलेख कार्यालयात अर्ज करत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमि अभिलेख कार्यालयात कर्मचारी वर्ग कमी असल्याने प्लॉट, शेती घेतल्यानंतर मोजणीकरीता चार ते सहा महिने थांबावे लागत असल्याने नागरिक/ शेतकरी यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूमि अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्याची संख्या वाढवून जमिनीची मोजणी व प्लॉटच्या मोजणी विनाविलंब करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२१-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे,

औरंगाबाद जिल्ह्यात भूमापकांची एकूण ४० पदे मंजूर असून ३८ पदे कार्यरत आहेत. प्रलंबित ४७ बिनशेती मोजणी प्रकरणांपैकी ३६ प्रकरणे, १ महातील, ६ प्रकरणे १ महावर, व ०५ प्रकरणे ०३ महावर शिल्लक आहेत. सदर मोजणी प्रकरणांस तसेच १५ गुंठेवारी प्लॉट मोजणी प्रकरणांस मोजणी तारखा देण्यात आलेल्या आहेत.

(३) औरंगाबाद जिल्ह्यात सध्या ड्रोन सर्व्हे मोजणी काम प्रगतीत आहे. तसेच ज्या गावांचा ड्रोन सर्व्हे पूर्ण झालेला आहे, अशा गावांमधील मिळकतींचे सनद तपासणी/वाटपाचे काम चालू आहे. सदर काम करुन नियमित मोजणी प्रकरणे हे कार्यालयातील भूमापक व भूमापकांव्यतिरिक्त उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार करुन घेण्यात येत आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील शेत जमीन मोजणीचे सहा महावर ३८ व एक वर्षावरील ०८ शिल्लक मोजणी प्रकरणे दिनांक ३०/०४/२०२२ अखेर निकाली करणे बाबत संबंधिताना जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचेस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवन नाही.

---

## राज्यात पोलीस भरती करण्याबाबत

**(१३) १३१५५ (३०-०३-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.बाळाराम पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस व्यवस्था बळकट करण्यासाठी तसेच राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागात ५० हजार पोलिसांची भरती करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस भरतीची प्रक्रिया कशाप्रकारे व केव्हापासून करण्यात येणार आहे तसेच सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२२) :** (१) व (२) सद्य:स्थितीत राज्यात एकूण ५२९७ पोलीस शिपाई संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून याव्यतिरीक्त पोलीस शिपाई संवर्गाची ७२३१ पदे भरण्याबाबत मा.मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली असून सदरहू भरती प्रक्रिया तातडीने सुरु करण्याचे नियोजन आहे.

तसेच सन २०२१ अखेरची रिक्त पदे व सन २०२२ अखेरची संभाव्य रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

यापुढे राबविण्यात यावयाची भरती प्रक्रिया सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार करण्यात येणार असून यामध्ये शारीरिक चाचणी प्रथम व त्यानंतर लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## पेण (जि.रायगड) तहसिल कार्यालयाद्वारे शपथपत्राकरीता नागरिक व विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्र उपलब्ध करून देण्याबाबत

**(१४) १३२४२ (३०-०३-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील तहसिल कार्यालयाने प्रतिज्ञापत्र देणे बंद केल्याने त्याकरीता येणारे तालुक्यातील नागरिक व विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना जातीचा दाखला काढण्याकरीता, शाळेचा हरवलेल्या दाखल्याची प्रत काढण्यासाठी तसेच विद्युत मीटर, आरटीओचे काम, नगरपरिषदेची कामे व इतर अनेक कारणांसाठी प्रतिज्ञापत्र सदर करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेण तहसिल कार्यालयातील अधिकाऱ्यांनी शासन आदेशाचा चुकीचा अर्थ काढून प्रतिज्ञापत्र बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत आदेश देऊन नागरिक व विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्र उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२२) :** (१), (२) व (३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१५ अन्वये, शासकीय कामकाज तसेच सेवा/ सुविधाकरीता अनेक शासकीय कार्यालयाकडून जेथे विद्यमान कायदा/ नियम याद्वारे अर्जासह शपथपत्र व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील, तेथे शपथपत्र व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. मात्र, जेथे शपथपत्र व साक्षांकित प्रती बंधनकारक नाही, तेथे शपथपत्राऐवजी स्वयंघोषणापत्र व प्रमाणपत्रे/ कागदांच्या साक्षांकित प्रती ऐवजी

स्वयं-साक्षांकणासाठी स्वयंघोषणापत्र स्विकारण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार पेण, जि.रायगड तहसिल कार्यालयाद्वारे कार्यवाही केली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनातील भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली झालेल्या कार्यवाहीच्या माहितीबाबत

**(१५) १३२५४ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी या लोकसेवकांविरूध्द भ्रष्टाचाराची दरवर्षी सरासरी ८३८ तक्रारी नोंदविण्यात येतात, तसेच वर्ष २०२० मध्ये ६६३ व २०२१ मध्ये ७७३ प्रकरणी तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी अनेक अधिकारी व कर्मचारी यांचेवर चौकशी अद्याप पर्यंत प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०६-२०२२) :** (१) व (२) सन २०२० व २०२१ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक कायदयानुसार दाखल गुन्हे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | शिर्षक | २०२० | २०२१ |
|---|---|---|---|
| ०१ | सापळा | ६३० | ७६४ |
| ०२ | अपसंपदा | १२ | ७ |
| ०३ | अन्य भ्रष्टाचार | २१ | २ |
| | एकूण गुन्हे | ६६३ | ७७३ |

उपरोक्त प्रमाणे दाखल गुन्हयाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| सन | तपासावार प्रलंबित | अभियोग पूर्व मंजूरी प्रलंबित | | अभियोग पूर्व मंजूरी प्राप्त | दोषरोप दाखल | समरी मंजूर | एकूण नोंद गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासन | सक्षम प्राधिकारी | | | | |
| २०२० | १५१ | २० | २६ | २३ | ४४२ | १ | ६६३ |
| २०२१ | ४८० | १४ | ७२ | २९ | १७७ | १ | ७७३ |

(३) लाचेच्या सापळयात अडकलेल्या अधिकाऱ्यांबाबत निलंबनाची कार्यवाही संबंधित विभागामार्फत करण्यात येते. याअनुषंगाने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या बैठकीत प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तातडीने आढावा घेऊन निलंबनाबाबतचा योग्य निर्णय घ्यावा अशा सूचना संबंधित विभागास देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधित लोकसेवकांच्या बाबतीत विभागीय चौकशीची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येते.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तातडीने आढावा घेऊन निलंबनाबाबतचा योग्य तो निर्णय घ्यावा असे बैठकीत मा.मुख्य सचिव यांनी निदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील गट नं.३८४ या जागेवर जिल्हा परिषद शाळेचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(१६) १३२८४ (३०-०३-२०२२) श्री.जयंत पाटील** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील गट नं.३८४ ही जागा श्री.प्रकाश गणपतराव शिंगाडे व इतर यांची असून या जागेवर जिल्हा परिषद शाळेचे अनधिकृत बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.काशिनाथ पुंडलिक राजापुरे यांनी सदर शाळा बांधण्यासाठी बक्षिस पत्राद्वारे गट नं.३८६ व ३८७ अशी ४ आर जमीन दिली असून गट नं.३८६ वर जिल्हा परिषद शाळेची इमारत बांधून गट नं.३८७ वर शाळेच्या चहुबाजूने संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गट नं.३८४ वर अस्तित्वात असलेल्या शाळेचे अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-०५-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत रिक्षा स्टँण्डवरच भाडे तक्ता प्रदर्शित करण्याबाबत

**(१७) १३३०५ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत शेअर रिक्षाचालक जादा भाडे आकारात असल्याच्या असंख्य तक्रारी प्रवाशांकडून प्राप्त होत असल्याने शेअर रिक्षा चालक आणि प्रवासी यांच्यात सातत्याने वादाचे प्रसंग उद्भवत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समस्येवर तोडगा म्हणून रिक्षा स्टँण्डवरच भाडे तक्ता प्रदर्शित केला जाईल, अशी घोषणा परिवहन आयुक्तांनी दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घोषणेच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०८-०६-२०२२) :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक ५ जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना शेअर-ए-टॅक्सी/ऑटोरिक्षा यांचे फलक व भाडेदर प्रदर्शित करणेबाबत सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पश्चिम महाराष्ट्र व खान्देशातील शेतकऱ्यांसाठी सामुहिक शेततळ्यांची योजना सुरु करण्याबाबत

**(१८) १३४०८ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या पश्चिम महाराष्ट्र व खान्देशात सामुहिक शेततळ्यांची योजना बंद असल्याने शेतकऱ्यांना मागेल त्याला शेततळे योजनेत अर्ज करावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागेल त्याला शेततळे योजनेत केवळ ५० हजार रुपयांचे अनुदान मिळत असल्याने सामुहिक शेततळी करता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्षांत ४०१ शेतकऱ्यांची सामुहिक शेततळयांची कामे झाल्यानंतर सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांची मागणी असूनही त्यांना अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पश्चिम महाराष्ट्र व खान्देशातील शेतकऱ्यांसाठी सामुहिक शेततळयांची योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०६-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नवीन प्राथमिक उपकेंद्र सरु करण्याबाबत

**(१९) ४२१९५ (०२-०८-२०१८) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १५ जिल्हयांमध्ये एकूण १२१४ नवीन प्राथमिक उपकेंद्र सरु करण्याबाबत केंद्र शासनाला लेखी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाला लवकर मंजूरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-०६-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
महाराष्ट्रातील ३४ जिल्हयात ९२०६ आरोग्यवर्धिनी उपकेंद्र स्थापित करणेबाबत प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला होता, त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता मिळाली आहे.
(२) सदर प्रस्तावास केंद्राची मान्यता प्राप्त झाली असून आज रोजी ६५५० उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र म्हणून कार्यान्वित झाली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिकलसेलग्रस्त विदर्भातच मॉलिक्युलर जेनेटिक लेबॉरेटरी (प्रयोगशाळा) उभारण्याबाबत

**(२०) ४३४६४ (२७-०६-२०१४) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वाधिक सिकलसेलग्रस्त विदर्भात असताना मॉलिक्युलर जेनेटिक लेबॉरेटरी (प्रयोगशाळा) पुण्या-मुंबईत मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिकलसेलग्रस्त विदर्भातच मॉलिक्युलर जेनेटिक लेबॉरेटरी (प्रयोगशाळा) उभारणे शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) सिकलसेलग्रस्त मॉलिक्युलर जेनेटिक लेबॉरेटरी (प्रयोगशाळा) डागा स्त्री रुग्णालय, नागपूर येथे उभारणीसाठी मंजूर करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेसाठी उपकरणे खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.